# प्रेसनोट

दि.११/१०/२०२२

## तहसील कार्यालय - दौंड येथील महसूल सहायकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. ५०५/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - तुषार वसंतराव शिंदे, वय - ३४ वर्षे.<br>पद - महसूल सहायक,वर्ग-३,नेमणूक - तहसील कार्यालय - दौंड, जि.पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,०००/- (चार हजार रूपये) |

सापळा दिनांक व ठिकाण :- १०/१०/२०२२, तहसील कार्यालय दौंड.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची पुनर्वसित वाटप झालेल्या शेतजमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील भोगवटा वर्ग २ हा शेरा कमी करुन भोगवटा वर्ग १ या शेऱ्याची अंमलबजावणी करण्याकरीता सातबाऱ्यावरील ऑनलाइन ब्लॉक काढून देण्यासाठी लोकसेवक शिंदे यानी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक शिंदे, महसूल सहायक यानी तक्रारदार यांचेकडे ५ हजार रूपयांची मागणी करुन तडजोडीअंती ४ हजार रुपये लाच रक्कम स्वीकारल्यावर रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक शितल घोगरे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

७. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
८. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
९. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
१०.व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
११.ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
१२.वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.